# जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांचे कार्यालय, चंद्रपूर

ई : मेल-chandrapur.rdc@gmail.com फोन क्रं. 07172- 250659

क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/ ८५५ दि. 31 ऑगस्ट, 2020

---

**वाचा :-** 1. साथरोग प्रतिबंधक कायदा, 1897
2. क्रिमिनल प्रोसिजर कोड 1973 चे कलम 144.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१
4. मा. मुख्य सचिव, महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनवर्सन, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर.92/डीआयएसएम-1 दि.31/08/2020

---

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय चंद्रपूर

## // आदेश //

ज्याअर्थी, शासन यांचेकडील आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर.92/डीआयएसएम-1 दि. 31/08/2020 अन्वये राज्यातील कोविड-19 च्या अनुषंगाने दिलेल्या सुधारीत सुचना व पुन्हा सुरु मोहिमेंतर्गत आदेश परित केलेला असून सदर लॉकडाऊन कालावधी दि. 30/09/2020 रोजीपर्यंत वाढविण्यात आला आहे.

त्याअर्थी, मी, अजय गुल्हाने, जिल्हा दंडाधिकारी, चंद्रपूर, फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 मधील तरतूदीनुसार, मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये, चंद्रपूर जिल्हयात दिनांक 01/09/2020 रोजीचे 00.00 वाजे पासून ते दिनांक 30/09/2020 रोजीचे 24.00 वा. पर्यंत खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**I) चंद्रपूर जिल्हा कार्यक्षेत्रात खालील बाबींना मनाई करण्यात येत आहे :-**

1) सर्व शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, प्रशिक्षण संस्था, कोचिंग इंन्स्टीटयुट या बंद राहतील. तथापि, ऑनलाईन/ अंतराचे शिक्षणास परवानगी राहील.

2) चित्रपट गृहे, जलतरण तलाव, करमणूक उद्याने, थिएटर (मॉल्स व मार्केट कॉम्प्लेक्समधील) बार, सभागृह, असेंब्ली हॉल यासारख्या इतर सर्व जागा बंद राहतील.

3) रेल्वे व विमान प्रवासी वाहतूक काही ठराविक आदेशाने मान्यता दिली असल्यास STANDARD OPERATING PROCEDURE नुसार चालू राहील.

4) सर्व सामाजिक, राजकीय, क्रिडा, मनोरंजन, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम व इतर मेळावे तसेच मोठया संख्येने लोक जमा होणारे कार्यक्रम, परिषदा बंद राहतील.

5) सार्वजनिक ठिकाणी पान, तंबाखु इत्यादी सेवन करण्यास मनाई करण्यात येत आहे.

3/8

6) सर्व धार्मीक स्थळे व प्रार्थना स्थळे सर्वसामान्यांसाठी बंद राहतील. तथापि, तेथील नित्य नियमाचे धार्मिक कार्यक्रम संबंधित धर्मगुरु, पुजारी यांना करता येतील.

7) वय वर्ष 65 वरील व्यक्ती, Persons With Co-morbidities, गर्भवती महिला, 10 वर्षा खालील मुले यांना अत्यावश्यक सेवा व वैद्यकीय सेवा वगळता इतर कारणास्तव बाहेर पडण्यास प्रतिबंध राहील.

II) चंद्रपूर जिल्हा कार्यक्षेत्रातील खालील बाबींना परवानगी राहील :-

1) दिनांक 2 सप्टेंबर, 2020 पासून सर्व हॉटेल व लॉजिंग यांना चालू ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि, शासनाने निर्धारित केलेली आदर्श कार्य प्रणाली (SOP) चे पालन करणे बंधनकारक राहील.

2) दिनांक 2 सप्टेंबर, 2020 पासून व्यक्ती व वस्तू यांच्या आंतरजिल्हा हालचालींवर कोणतीही बंधने राहणार नाहीत. अशा हालचालींसाठी वाहने आणि त्यातून प्रवास करणाऱ्या व्यक्तींसाठी स्वतंत्र परवानगी /मान्यता/ई-परवान्याची आवश्यकता असणार नाही.

3) दिनांक 2 सप्टेंबर, 2020 पासून खाजगी बस, मिनी बस व इतर यंत्रणेव्दारे प्रवासी वाहतूकीसाठी परवानगी राहील. तथापि त्याकरीता परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी निर्देशित केलेल्या आदर्श कार्य प्रणाली (SOP) चे पालन करणे बंधनकारक राहील.

4) बाहय शारिरीक क्रियाकलाप (Outdoor Physical Activities) करण्यास कोणतेही बंधन असणार नाही.

5) सर्व सार्वजनिक व खाजगी वाहतूकीतील लोकांच्या हालचाली करण्यास खालीलप्रमाणे परवानगी राहील.

अ. टॅक्सी / कॅब/ ॲग्रीगेटर - फक्त अत्यावश्यक 1+ 3
आ. रिक्षा - फक्त अत्यावश्यक 1+ 2
इ. चार चाकी- फक्त अत्यावश्यक 1+3
ई. दोन चाकी – 1 + 1 मास्क व हेल्मेटसह
प्रवास करताना कायम मास्कचा वापर करणे बंधनकारक असेल.

6) सर्व मार्केट/ दुकाने सकाळी 9.00 ते सायंकाळी 7.00 वा. या वेळेमध्ये चालु राहतील. तथापि, मेडीकल/औषधाची दुकाने पुर्णवेळ चालू ठेवण्यास परवानगी राहील. जर पाच पेक्षा जास्त व्यक्ती दुकानात असल्यास अथवा सामाजिक अंतराचे पालन न केल्यास सदर दुकाने तात्काळ बंद करावीत.

7) चंद्रपूर जिल्हयातील प्रतिबंधित क्षेत्रामध्ये कोणतेही कार्यक्रम आयोजीत करणेस मनाई आहे. तथापि, प्रतिबंधित क्षेत्र वगळून इतर क्षेत्रात खुले लॉन, विना वातानुकूलित मंगल कार्यालय/हॉल/सभागृह, घर व घराच्या परिसरात 50 लोकांच्या (संपुर्ण कार्यक्रमासाठी) मर्यादेत लग्नाशी संबंधित मेळावे/ समारंभाचे आयोजन करणेकामी संबंधित उपविभागीय दंडाधिकारी/तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

8) अंत्यविधी यासारख्या कार्यक्रमास 20 पर्यंत (संपुर्ण कार्यक्रमासाठी) व्यक्तींना सामाजिक अंतर ठेऊन परवानगी राहील.

9) वृत्तपत्र छपाई आणि वाटप करणेस परवानगी देण्यात येत आहे. (घरपोच वितरणासह)

10) केश कर्तनालय, स्पा, सलून, ब्युटी पार्लर हे शासनाने दिलेल्या अटी व शर्ती तसेच या कार्यालयाकडील यापुर्वी दिलेल्या अटी व शर्तीन्वये चालू ठेवणेस परवानगी देण्यात येत आहे.

11) चंद्रपूर जिल्हयातील सर्व सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र व आधारकेंद्र जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर यांचेकडील आदेश क्रं.मशा/कार्या-4/टे-12/अकासेतु/2020/134 दि. 21.05.2020 मधील अटी व शर्तीन्वये चालू ठेवण्यास परवानगी राहील.

12) चंद्रपूर जिल्हयातील इंधन पंप, औदयोगिक आस्थापना व सर्व वैदयकीय आस्थापना पुर्णवेळ चालू ठेवणेस परवानगी आहे.

13) अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर यांनी अन्य कोणत्याही विशिष्ट/सामान्य आदेशाव्दारे परवानगी देणेत आलेली कृती करणेस परवानगी राहील.

**III) कोविड -19 चे <u>व्यवस्थापनाच्या अनुषंगाने खालील राष्ट्रीय निर्देशांचे पालन करणे बंधनकारक असून पालन न झाल्यास संबधीत हे दंडात्मक/फौजदारी कारवाईस पात्र राहील :-</u>**

1) सार्वजनीक ठिकाणी, घराबाहेर व घरामध्ये जेथे लोकांचा वावर आहे तेथे असताना चेह-याचे तोंडावर व नाकावर **मास्कचा वापर न करणा-या व्यक्तींवर** 200/- **रु दंड** आकारावा.

2) चंद्रपूर जिल्ह्यातील कोणत्याही सार्वजनिक अथवा ज्या ठिकाणी लोकांचा वावर जास्त प्रमाणात आहे अशा खाजगी जागेच्या ठिकाणी थूंकणेस मनाई असून, थुंकल्यास 200/- रु दंड आकारावा.

3) दुकानामध्ये प्रत्येक ग्राहकामध्ये किमान 6 फुट अंतर राहील याची खात्री करावी. तसेच दुकानामध्ये एकावेळी 5 पेक्षा जास्त व्यक्तींना घेणेस मनाई करणेत येत आहे. सदर आदेशाचे ग्रामीण भागात प्रथम उल्लंघन झाल्यास रु.500/- दंड आकारावा. ग्रामीण भागात दुसऱ्यांदा

उल्लंघन झाल्यास रू. 1000/- दंड आकारावा व ग्रामीण भागात तिसऱ्यांदा उल्लंघन झाल्यास दुकानाचा परवाना तीन दिवसांसाठी निलंबित करून सदर दुकान तीन दिवसांसाठी बंद ठेवणेत यावे. सदर आदेशाचे शहरी भागात प्रथम उल्लंघन झालेस रु. 1000/- दंड आकारावा. शहरी भागात दुसऱ्यांदा उल्लंघन झालेस रू. 2000/- दंड आकारणेत आकारावा. व शहरी भागात तिसऱ्यांदा उल्लंघन झालेस दुकानाचा परवाना तीन दिवसांसाठी निलंबित करून सदर दुकान तीन दिवसांसाठी बंद ठेवणेत यावे. ग्रामीण व शहरी दोन्ही भागात सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावी.

4) जिल्हयात सार्वजनिक ठिकाणी, लोकांचा वावर असणाऱ्या खाजगी ठिकाणी तसेच वाहतुकीच्या साधनामध्ये सामाजिक अंतर पाळणे बंधनकारक आहे.

**IV) कामाच्या ठिकाणी खालील अतिरिक्त निर्देशांचे पालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहील :-**

1) शक्य असेल त्या ठिकाणी घरातुन काम करण्यास प्राधान्य दयावे.

2) कामाच्या आणि व्यवसायाच्या वेळा या कार्यालयामध्ये, कामाच्या ठिकाणी मार्केटमध्ये, औद्योगिक तसेच व्यावसायीक आस्थापनेमध्ये गर्दी होणार नाही, अशा पद्धतीने विभागून दयाव्यात. THERMAL SCREENNING, हॅडवॉश, सॅनिटायझर, याची ENTRY POINT व EXIT POINT वर व्यवस्था करावी.

3) कामाच्या ठिकाणी, सार्वजनिक उपयोगाच्या जागा व सामान्य माणसाच्या वापरात येणाऱ्या सर्व जागा व वस्तू यांचे वेळोवेळी सॅनिटायझेशन करणेत यावे.

4) औद्योगिक व व्यावसायिक आस्थापना यांनी त्यांचे कामगारामध्ये, कामाची पाळी बदलणेचे वेळी, जेवणाचे व इतर सुट्टीचे वेळी, कामावर येताना व कामावरुन सुटताना सामाजिक अंतर पाळणे बंधनकारक आहे.

**V) आरोग्य सेतु ॲप चा वापर :-** जिल्हयातील सर्व नागरिकांना शासकीय कार्यालयात तसेच सर्व सार्वजनिक ठिकाणी आरोग्य सेतू या ॲपचा वापर करणे आवश्यक राहील. तसेच हे ॲप व त्यावरील माहिती प्रत्येकाने वेळोवेळी अद्ययावत करावी.

**VI)** मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनवर्सन, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर.92/डीआयएसएम-1 दि. 31/08/2020 मधील Annexure I मध्ये नमूद केलेल्या सुचनांचे पालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहील.

VII) ज्या ठिकाणी कोरोना रुग्ण सापडतो, त्या ठिकाणी CONTAINMENT ZONE जाहीर करण्याचे अधिकार INCIDENT COMMANDER म्हणून संबंधित उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. संबंधित CONTAINMENT ZONE बाबत उपविभागीय अधिकारी हे वेगळा आदेश काढून त्या Zone मध्ये कोणत्या बाबी चालु राहतील व कोणत्या बाबी प्रतिबंधित राहतील याबाबत सर्वांना सुचित करतील. हा आदेश CONTAINMENT ZONE वगळता चंद्रपूर जिल्हयातील इतर क्षेत्रासाठी लागू राहिल. तसेच CONTAINMENT ZONE बाबत त्या-त्या क्षेत्रातील INCIDENT COMMANDER यांचे अस्तित्वात असलेले आदेश हे संबंधित क्षेत्रात लागू राहतील. तसेच CONTAINMENT ZONE INACTIVE झालेनंतर सदर क्षेत्राला सदरचा आदेश लागू राहतील. तसेच भविष्यामध्ये जर चंद्रपूर जिल्हयातील कोणत्याही ठिकाणी कोरोनाचे रुग्ण आढळतील त्या ठिकाणी संबंधित INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय अधिकारी हे सदर ठिकाणी नव्याने CONTAINMENT ZONE जाहिर करुन वेगळा आदेश काढून त्या Zone मध्ये कोणत्या बाबी चालु राहतील व कोणत्या बाबी प्रतिबंधित राहतील याबाबत सर्वांना सुचित करतील.

कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेला, सदर आदेशात कोणत्याही प्रकारचा बदल करून किंवा नवीन आदेश पारीत करून या आदेशाच्या विसंगत कोणताही आदेश, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर यांचे पुर्व परवानगीशिवाय पारीत करता येणार नाही.

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधीतांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधीतांचे विरुध्द मा. मुख्य सचिव, महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनवर्सन, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर.92/डीआयएसएम-1 दि. 31/08/2020 मधील Annexure -III मध्ये नमूद केल्याप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 51 ते 60 व भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 नुसार तसेच साथरोग अधिनियम, 1897 अन्वये दंडनीय / कायदेशीर कारवाई संबंधित पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी करावी.

सदरचा आदेश आज दि. 31.08.2020 रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत करुन दिनांक 01.09.2020 चे 00.00 ते दिनांक 30.09.2020 चे 24.00 वाजेपर्यंतचे कालावधीकरिता संपुर्ण चंद्रपूर जिल्हयाचे हद्दीत लागु राहील.

31/8

(अजय गुल्हाने)
**जिल्हा दंडाधिकारी, चंद्रपूर**

o/c

**प्रतिलीपी :- माहितीस सविनय सादर.**

1. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – 032
2. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, मदत व पुनर्वसन, महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई - 032
3. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर

**माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव**

4. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
5. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
6. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
7. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. चंद्रपूर
8. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
9. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
10. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
11. मुख्याधिकारी, नगर परिषद/ नगर पंचायत (सर्व)
12. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)

**सदर आदेशाची उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय * चंद्रपूर *

3/8

**जिल्हा दंडाधिकारी, चंद्रपूर**

O/C